गुरुवार, दि. ४ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना महापालिकेचा महाघोटाळा!

## स्वच्छतेच्या नावाखाली २५ कोटींची लूट, आयुक्तांना तात्काळ बडतर्फ करा; आपची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील स्वच्छता विभागाच्या कामांमध्ये तब्बल २५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप आम आदमी पार्टी (AAP) ने केला आहे. हा आरोप आपचे जालना शहर महानगराध्यक्ष संजोग हिवाळे आणि महानगर महासचिव तनुज बाहेती यांनी पत्रकार परिषदेत केला. या परिषदेत घोटाळ्याचे दस्तऐवजी पुरावेही त्यांची यावेळी दाखविले. यात २०१३ ते २०१७: निविदा न काढता, फक्त मुदतवाढ देत २.६८ कोटींचा अपहार., २०१८-२०: शहरातील गटारे व नाले स्वच्छतेच्या नावाखाली ८.६१ कोटी रुपये लाटले., १२ वा वित्त आयोग (२०१६-१७): ३.६५ कोटी रुपयांचा खर्चाचा पुरावा उपलब्ध नाही., २०१९-२०: GEM पोर्टलवरून ३ कॉम्पॅक्टर वाहने खरेदी करताना २२.२५ लाखांची वाढीव देयक रक्कम., घनकचरा प्रकल्प: ७६ लाख रुपये खर्च करूनही प्रकल्प अद्याप अपूर्ण., कोरोना काळ (२०२०-२१): नालेसफाई, कचरा संकलनासाठी १.२४ कोटी रुपये आणि साहित्य खरेदीच्या नावाखाली ४३ लाखांचा हिशोबच नाही., १४ वा वित्त आयोग (२०२१-२२): स्वच्छता कामासाठी १.७२ कोटी रुपये दिले, पण दाखवलेले काम आणि प्रत्यक्ष आकडेवारी जुळत नाही., बायो मायनिंग: ३.६५ कोटी रुपयांची निविदा; पण कंपोस्ट उत्पादन व विक्रीचे कोणतेही रेकॉर्ड नाही., कुत्र्यांचे निर्बिजीकरण (२०२३-२४ व २०२४-२५): ४० लाख रुपये खर्च दाखवले, पण कामाची कोणतीही नोंद किंवा प्रमाणपत्रे नसल्याचे आरोप केले आहेत.

त्यांनी म्हटले आहे की, मजुरांना रोखीने किंवा चेकने पगार दिला गेला नाही., वाहनांची फिटनेस प्रमाणपत्रे, इंधन खर्च, विमा, ढळ्ळ, GST यांचे रेकॉर्ड नाही., काही ठेक्यांसाठी फक्त कागदोपत्री व्यवहार दाखवून निधीची उचल., स्वच्छतेच्या दाखवलेल्या किलोमीटर आकडेवारीत गंभीर विसंगती आहे. जुलै २०२५ मध्ये महापालिकेने या आरोपांचे खंडन करतांना विभागीय आयुक्त आणि अंदाज समितीकडून क्लीन चिट मिळाल्याचा दावा केला असला तरी आपने या दाव्याला आव्हान देत, अहवाल जनतेसमोर प्रसिद्ध करण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर आयुक्तांची तात्काळ बडतर्फी करण्यात यावी. ईडी आणि सीबीआय चौकशीची नियुक्ती करावी, तपास अहवाल जनतेसमोर सार्वजनिक करावा अशी मागणी आपच्यावतीने करण्यात आली आहे. या पत्रकार परिषेदेला सुभाष देठे ,फिरोज बागवान, रवी सूर्यवंशी इत्यादी हजर होते.




परतूर मंठा तालुक्यातील ६९ रस्त्यांना दर्जाउन्नती

# रस्ते विकासाचा मार्ग मोकळा - आ. लोणीकर

**जालना । प्रतिनिधी -** आपण केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, गेल्या अनेक वर्षापासून, रस्त्याच्या विकासापासून वंचित राहिलेल्या ग्रामीण भागातील मार्गांना दर्जा उन्नती मिळाल्यामुळे, ग्रामीण भागातील रस्ते विकासाचा मार्ग मोकळा झाला असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

पुढे या पत्रकार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे की, गेल्या कित्येक वर्षापासून शासनाच्या विविध योजनातील निधी देऊन या रस्ते विकासाच्या मागणीसाठी केली जात होती मात्र या रस्त्यांना क्रमांक नसल्यामुळे या ठिकाणी निधी टाकून रस्ते बांधकाम करणे शक्य होत नव्हते मात्र आता रस्ते या ग्रामीण रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देता येणार असून या मुळे सामान्य शेतकरी यांच्यासह रहदारी करणाऱ्याचा प्रश्न आता कायम निकाली निघणार आहे असेही या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.



पुढे या पत्रकात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे की, अनेक वेळा अनेक गावातील नागरिक आपल्याकडे रस्त्याला निधी टाका रस्त्याचे काम करा अशी मागणी घेऊन अनेक नागरिक येत होते मात्र या रस्त्यांना क्रमांक नसल्याने आपली इच्छा असूनही निधी उपलब्ध करून देऊ शकत नव्हतो मात्र या पुढे दर्जा उन्नती ( क्रमांक )मिळालेल्या रस्त्यांना निधी उपलब्ध करता येणार असून या रस्त्यांचा विकास करता येणार आहे असेही या पत्रकात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे.

ग्रामीण भागातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या रस्त्यामुळे अनेक अडचणी होत्या मात्र या सर्व रस्त्यांना क्रमांक मिळाल्यामुळे या पुढे शेतकरी विविध गावकरी यांच्या समस्या सुटणार असल्याची या पत्रकार नमूद करण्यात आले आहे.

# राहत सोशल ग्रुपच्यावतीने मुस्लिम सामूहिक विवाहांचे आयोजन

## खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या हस्ते भिंतीपत्राचे अनावरण




**जालना । प्रतिनिधी -** राहत सोशल ग्रुप जालना गेल्या २५ वर्षांपासून जालन्यात मुस्लिम सामूहिक विवाहांचे यशस्वीरित्या आयोजन करत आहे. आतापर्यंत राहत सोशल ग्रुप जालना आयोजित मुस्लिम सामूहिक विवाहांमध्ये ६०० हून अधिक मुस्लिम जोडप्यांचे लग्न झाले आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही राहत सोशल ग्रुप जालना ७ डिसेंबर २०२५ रोजी रविवार, आयेशा लान्स, उर्दू हायस्कूलच्या मागे, कचेरी रोड, जालना येथे मुस्लिम सामूहिक विवाहांचे आयोजन करत आहे. या मुस्लिम सामूहिक विवाहांच्या भिंतीपत्राचे अनावरण आज दुपारी ४ वाजता जालना खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या हस्ते जालना येथील अंबर रोड येथील त्यांच्या कार्यालयात करण्यात आला. यावेळी खासदार जालना डॉ. कल्याण काळे, अध्यक्ष राहत सोशल ग्रुप जालना शेख अफसर शेख जी, संस्थापक सचिव लियाकत अली खान यासिर, प्रदेश काँग्रेस आय अल्पसंख्याक सेल उपाध्यक्ष बदर चाऊस, सलीम यासीन खान पठाण, अतिक अहमद खान शहर काँग्रेस आय अध्यक्ष, शेर जमां खान, शेख सलीम, अब्दुल रऊफ परसुवाले, शेख इब्राहिम, जाकीर भाई डावरगावकर, राजेंद्र राख, कल्याण दले आणि इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. कल्याण काळे यांनी राहत सोशल ग्रुप जालनाच्या अधिकाऱ्यांना संबोधित करताना सांगितले की, राहत सोशल ग्रुप जालना गेल्या २५ वर्षांपासून मुस्लिम सामूहिक विवाहाच्या माध्यमातून एक महान सामाजिक कर्तव्य बजावत आहे आणि आम्ही राहत सोशल ग्रुप जालनाच्या सर्वतोपरी सहकार्यासाठी नेहमीच तयार आहोत. या प्रसंगी खासदार जालना डॉ. कल्याण काळे यांनी जिल्ह्यातील जनतेला आवाहन केले आहे की, २० नोव्हेंबर २०२५ पूर्वी मुला-मुलीच्या पालकांनी राहत सोशल ग्रुप जालनाचे अध्यक्ष शेख अफसर शेख जी ९४२२२१८२२०, लियाकत अली खान यासिर- ९४२२७२४२५७, पान २ वर

# मोफत आरोग्य शिबीराने आरोग्यसेवा लोकांपर्यंत पोहोचवण्याचा विधायक उपक्रम

## शिवसेना शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** शहरात दिवंगत स्व. किशनलाल प्रेमचंदजी काठोठीवाले (बडे पहलवान) यांच्या चतुर्थ पुण्यतिथीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत निःशुल्क मधुमेह व थायरॉईड तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे आरोग्य सेवा थेट लोकांपर्यंत पोहोचवून सामान्य जनतेला मधुमेह, थायरॉईड आणि इतर दीर्घकालीन आजारांवर मार्गदर्शन मिळावे हा हेतू आहे. मधुमेह व थायरॉईड या आजारांचे प्रमाण गेल्या काही दशकांत झपाट्याने वाढले असून, ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात नागरिक या व्याधींना तोंड देत आहेत. अशा परिस्थितीत मोफत तपासणी शिबीर हा जनतेसाठी दिलासा देणारा उपक्रम ठरत आहे.



या शिबिरात ब्लड प्रेशर, डायबिटीज, थायरॉईड, आर्थ्रायटीस, स्ट्रोक (लकवा), हृदयविकार, दमा, आम्लपित्त, बद्धकोष्ठता, किडनी स्टोन, डायलिसिस, गुडघेदुखी, मायग्रेन यांसारख्या व्याधींवरही वैद्यकीय मार्गदर्शन मिळणार आहे. डॉ. श्रीराम दिनकर कुलकर्णी हे या शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक असून त्यांना या क्षेत्रात १९ वर्षांचा अनुभव आहे.


हे शिबीर येत्या शुक्रवार (दि ४) रोजी सकाळी सकाळी १० ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत, तेली पंचायती वाडा, उत्तार गल्ली, कादबाद, जालना येथे होणार आहे.

या उपक्रमाचे आयोजन दुर्गेश काठोठीवाले (शिवसेना शहरप्रमुख, जालना) यांनी केले आहे. सामान्य नागरिकांना आरोग्यसेवेचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, आजार टाळण्यासाठी वेळेत तपासणी करावी हा या शिबिरामागील मूळ उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

जालना सारख्या शहरात आरोग्य सुविधा वाढल्या असल्या तरी अनेक नागरिक तपासणी व उपचार टाळतात. याचे मुख्य कारण म्हणजे तपासणीचा खर्च आणि जागरूकतेचा अभाव. अशा वेळी समाजोपयोगी उपक्रमातून मिळणारे मोफत तपासणी शिबीर हे नागरिकांसाठी वरदानच ठरत आहे. विशेषतः मधुमेह व थायरॉईड यांसारख्या आजारांमध्ये लवकर निदान म्हणजे अर्धा उपचार हे सत्य आहे. त्यामुळे या शिबिरातून शेकडो रुग्णांना योग्य वेळी तपासणी आणि मार्गदर्शन मिळण्याची शक्यता आहे.

सामाजिक बांधिलकीतून राबविले जाणारे असे आरोग्य शिबीर केवळ पुण्यतिथीला योग्य आदरांजली तर ठरतेच समाजासाठी आरोग्यदायी दिशा ही ठरते. नागरिकांनी अशा शिबिरांचा लाभ घेऊन आरोग्याविषयी जागरूक राहणे गरजेचे आहे.

# सुप्रिया कॉलेज ऑफ फार्मसी लाव्हेरी गुड मानांकन प्राप्त




**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील सुप्रिया कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयास शैक्षणिक सत्र २०२४- २५ करिता महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या तज्ञ निरीक्षक समितीकडून व्हेरी गुड (तशीू ॠेेव) हे मानांकन प्रदान केली आहे.

महाविद्यालय पी.सी.आय. नवी दिल्ली, डी.टी.ई.मुंबई, एम.एस.बी.टी.ई मान्यता प्राप्त महाविद्यालय आहे.वर्षातून दोन वेळा तज्ञ समितीकडून महाविद्यालयाची तपासणी केली जाते,यामध्ये तज्ञ निरीक्षकांकडून महाविद्यालयाची भेट घेऊन विद्यार्थ्यांना पुरवल्या जाणाऱ्या सुविधा,महाविद्यालयाची इमारत, महाविद्यालयाचे प्राध्यापक वर्ग तसेच त्यांचा अनुभव व त्यांचे शिक्षण, महाविद्यालयातील ग्रंथालय, विद्यार्थ्यांना दिलेले जाणाऱ्या सर्व सोयी-सुविधा यासंबंधीचा सखोल आवश्यक सुविधांची तपासणी केली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांचा अभिप्राय घेतला जातो महाविद्यालयातील प्रयोगशाळा व उपकरणे विद्यार्थ्यांचा निकाल या सर्व बाबींचा सखोल निरीक्षण करूनच समिती अहवाल सादर करते व त्यातूनच महाविद्यालयाची गुणवत्ता ठरवली जाते. हे महाविद्यालय सन २०२२ मध्ये सुरू पान २ वर

**झाडे लावा**

**झाडे जगवा**

# स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहर महानगरपालिकेने शहराची स्वच्छता राखण्यासाठी कठोर पाऊले उचलली आहेत. घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६, राष्ट्रीय हरित लवाद कायदा २०१० आणि पर्यावरण संरक्षण कायदा १९८८ नुसार, शहरात सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, कचरा जाळणे किंवा स्वच्छतेबाबत नियमांचे उल्लंघन करणे हे दंडनीय गुन्हा ठरवण्यात आले आहे. या नियमांनुसार, नियमीत स्थळ पाहणी करून उपद्रव करणाऱ्यांवर दंड आकारणी करण्यात येत आहे.

दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी, सदर बाजार १ विभागामध्ये अशाच एका कारवाईत एका होलसेल विक्रेत्यावर रु ५,००० चा दंड आकारण्यात आला. रामेश्वर फॅन्सी होलसेल विक्रेता, सिधी बाजार, लक्ष्मीमाता मंदिर जवळ, देऊळगाव राजा रोड, जालना यांच्या दुकानासमोर सार्वजनिक रस्त्याच्या बाजूला कचरा जाळलेला आढळून आला. तसेच, दुकानात कचरा ठेवण्यासाठी डस्टबिन न ठेवल्यामुळे ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईच्या माध्यमातून, जालना महानगरपालिकेने सर्व नागरिक आणि व्यावसायिक आस्थापनांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपल्या कचऱ्याचे योग्य नियोजन करावे. ओला आणि सुका कचरा वेगळा करून घंटागाडीतच टाकावा. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे किंवा जाळणे हे गंभीर गुन्हा मानले जाईल आणि तसे आढळल्यास कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

यापुढेही, स्वच्छ भारत अभियानाला पाठिंबा देत शहराचे सौंदर्य आणि आरोग्य जपण्यासाठी प्रशासनाकडून अशा प्रकारच्या कारवाया सुरूच राहतील, असे संकेत मिळत आहेत.



# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांसमोरील आव्हाने

भारत सरकारने नवीन शैक्षणिक धोरण २०२० (NEP) जाहीर केले आहे .आणि त्याची अंमलबजावणी देखील सुरू केलेली आहे. त्यामुळे शिक्षण प्रणालीत खूप मोठे बदल सुचविले गेले आहेत. या धोरणांमध्ये राष्ट्रीय शिक्षण हे शिक्षक सक्षमीकरणावरती विशेष भर देण्यात आलेला असून प्रत्येक मूल शिकले पाहिजे. त्याचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे .असे ध्येय आपण जेव्हा ठरवितो तेव्हा त्यासाठी शिक्षकांनी नवनवीन विचारप्रवाह, विषय ज्ञान ,अध्यापनशास्त्र, विविध धोरणे इत्यादी विषयी अद्यावत असणे आवश्यक आहे.

आज भारतामध्ये ३४ वर्षानंतर शिक्षण धोरणात मोठा बदल करण्यात आलेला आहे १९८६ नंतर प्रथमच २०२० मध्ये नवीन शैक्षणिक धोरण(छएझ) २०२० लागू करण्यात आला त्याचा उद्देश सर्वांगीण समावेश गुणवत्ता पूर्ण आणि सर्वांसाठी उपलब्ध शिक्षण असा आहे हे शैक्षणिक धोरण भारताला केंद्रस्थानी मानून सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करून आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय व चैतन्यमय ज्ञानसंपन्न समाजामध्ये परावर्तित करण्यास योगदान देण्याची दूरदृष्टी ठेवते. त्यामुळे येणाऱ्या काळात शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल अपेक्षित आहे.

नवीन शैक्षणिक धोरणाने सर्व १)विद्यार्थ्यांना ते कुठेही राहात असले तरीही दर्जेदार व्यवस्था पुरविली पाहिजे.२) सर्वांना सहज शिक्षण३) समता४) गुणवत्ता आणि परवडणारे शिक्षण ५)उत्तरदायितत्व या पाच मूलभूत स्तंभांवर नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण(NEP) २०२० आधारित आहे. शालेय शिक्षणाची ५+३+३+४ अशी नवीन रचना आहे. प्रत्येक स्तराची गुणवत्ता सुनिश्चित करण्यावर हे धोरण भर देते. कौशल्य शिक्षणास, प्रोत्साहनास वाव, धोकंम पट्टीवर आधारित शिक्षण कमी करण्यासाठी, अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्रात बदल करण्यात आलेला आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे २१ व्या शतकातील पहिलेच शैक्षणिक धोरण आहे. ते १९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची जागा घेते .प्रवेश ,समता, गुणवत्ता ,परवडणारे शिक्षण आणि जबाबदारी या मूलभूत स्तंभावर उभारलेले धोरण २०३० च्या ध्येयाशी जोडले गेलेले आहे. २१ व्या शतकाच्या गरजेनुसार अनुकूल करण्याची प्रत्येक विद्यार्थ्याच्या अद्वितीय क्षमता ओळखून त्या विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवून देशाला एक परिवर्तनशील ज्ञानी समाज आणि जागतिक ज्ञान महासत्तेत रूपांतरित करण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवलेले आहे.

डॉ. कस्तुरी रंगन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने १)पूर्व प्राथमिक शिक्षणापासून२) उच्च शिक्षणापर्यंत तसेच ३) व्यावसायिक शिक्षणापर्यंत विस्तृतपणे अनेक गोष्टींचा विचार केलेला आहे व ३१ मे २०१९ रोजी तो सादर केला आणि २९ जुलै २०२० रोजी त्याला केंद्रीय मंत्रिमंडळाकडून मान्यता मिळाली आणि त्यात एकूण चार विभाग केलेले आहेत त्यात १)शालेय शिक्षण२) उच्च शिक्षण ३)लक्ष करावे याचे इतर काही मुद्दे ४) प्रत्यक्षात धोरण अंमलबजावणी होण्यासाठीच्या बाबी अशी चार विभागात मांडणी करण्यात आलेली आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० हे २१ व्या शतकातील शिक्षण अधिक सर्व समावेशक कौशल्यधिष्ठीत व विद्यार्थी केंद्रीत करण्यासाठी तयार केले गेलेले आहे .यात शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा सर्वांत महत्त्वाचा स्तंभ मांडलेला आहे त्यामुळे शिक्षकाची भूमिका व त्याच्या पुढील आव्हाने स्पष्टपणे दिसून येतात.

(NEP) चे मुख्य उद्दिष्ट म्हणजे १) विद्यार्थी केंद्रीत शिक्षण- प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या आवडीप्रमाणे शिकण्याची संधी मिळाली पाहिजे. २) समग्र व कौशल्याधारित शिक्षण- ज्ञानाबरोबरच जीवनमूल्य, कौशल्य आणि नवनिर्मिती करून त्याचा संशोधनाचा विकास करणे.३ ) बालपणीचे शिक्षण मातृभाषेतून व प्रांतीय भाषेतच असावे ४) अभ्यासक्रम लवचिक असावा - कला ,क्रीडा विज्ञान ,व्यावसायिक अभ्यास यांचा एकत्रितपणे त्यात समावेश असावा ५) अभ्यासक्रमात तंत्रज्ञानाचा वापर असावा- शिक्षणामध्ये डिजिटल साधनांचा व्यापक प्रमाणामध्ये वापर करावयास पाहिजे. ६) समानता व सर्वसमावेशकतेवर भर देऊन ग्रामीण वंचित व अपंग विद्यार्थ्यांसाठी समान शैक्षणिक संधी मिळाली पाहिजे .७) शिक्षकांचे गुणवत्ता पूर्ण संवर्धन झाले पाहिजे. शिक्षक प्रशिक्षण व व्यावसायिक विकास आणि संशोधनावर भर देण्यात आला पाहिजे

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षकांसमोर हे एक मोठे आव्हान आहे आणि ते शिक्षकांनी स्वीकारून ध्येयापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे ते म्हणजे

१)शिक्षकांनी फक्त केवळ विषय शिकवणे नाही तर विविध विषय एकत्रित करून सृजनतेने शिकविण्याची गरज आहे २)तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे डिजिटल साधने व ऑनलाईन शिक्षण पद्धती आत्मसात केली पाहिजे.३) भाषिक आव्हाने स्वीकारून म्हणजेच मातृभाषेमध्ये शिक्षण देताना प्रमाण भाषा व इंग्रजी भाषा यांचाही समतोल राखला गेला पाहिजे.४) नवीन मूल्यमापन पद्धतींचा स्वीकार केला पाहिजे व गुणांधारित न राहता कौशल्य, प्रकल्प, कृतींवर आधारित मूल्यमापन केले पाहिजे. ५) विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकासच नव्हे तर भावनिक, सामाजिक, नैतिक विकास घडवून आणला पाहिजे. ६) त्याचा सर्वांगीण विकास करण्याची सर्वांत महत्त्वाची जबाबदारी शिक्षकाची आहे ७) शिक्षकांनी स्वतः सतत नवनवीन ज्ञान, कौशल्य, नवीन शैक्षणिक पद्धती जीवनमूल्य, प्रशिक्षणे आत्मसात करणे आवश्यक आहे. तसेच ८)पालक व समाजाचे सहकार्य, सहभाग घेऊन शैक्षणिक प्रक्रिया अधिक गतिमान केली गेली पाहिजे. याचाच अर्थ शिक्षकांना नवीन नवीन तंत्रज्ञान विविध कौशल्य समग्र शिक्षण पद्धती आत्मसात करण्याची सर्वात मोठी जबाबदारी आहे. ९)आपले ध्येय निश्चित करणे आवश्यक आहे मुलांचा सर्वांगीण विकास घडविणे चांगल्या सवयी शिस्त व मूल्य रुजविणे प्रत्येक मुलांमध्ये दडलेली क्षमता ओळखून त्यांना प्रोत्साहन देऊन सुजाण आत्मविश्वासू व जबाबदार नागरिक बनविणे हे शिक्षकाचे ध्येय असणे आवश्यक आहे.



**सौ संतोषी संपत बांगर**
**( सहाय्यक शिक्षिका )**
**प्राथमिक विभाग.**
**शाळा- सह्याद्री विद्यामंदिर**
**भांडुप (पश्चिम).**

# शाश्वत विकासाची दूरदृष्टीपूर्ण लोकचळवळ; मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

आपला भारत देश हा कृषिप्रधान आहे आणि गाव हे त्याचे प्राणकेंद्र आहे. त्यामुळे गावांचे प्रश्न सोडविल्याशिवाय आणि त्यांचा शाश्वत विकास साधल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. शाश्वत विकास हा असा विकास आहे, जो सध्याच्या पिढीच्या गरजा भागविताना पुढील पिढ्यांसाठी साधन संपत्तीचे सातत्याने संवर्धन करत राहतो. म्हणूनच गावांचा शाश्वत विकास हा आपल्या राज्याच्या व राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज अनेक गावांमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, रस्ते, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा या मूलभूत गरजांसह रोजगार, माहिती तंत्रज्ञान, शाळांमध्ये शिक्षणाचा उच्च दर्जा, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण सुविधा, प्राथमिक आरोग्य केंद्रे तेथे औषधांची उपलब्धता, तज्ञ डॉक्टरांची सेवा अशा प्राथमिक चांगल्या सुविधा उपलब्ध करणे यासाठी शासन मोठ्या प्रमाणात काम करते.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. अभियानाचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी १७ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे. ही अंमलबजावणी केवळ स्पर्धात्मक राहणार नसून ग्रामविकास अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप देणारी ठरेल.

हे अभियान राबविण्याची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. २९ जुलै २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाची यास मंजुरी मिळाली व अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महत्वाचे पाऊल टाकले गेले. अभियान राबविण्यासाठी रु २९०.३३ कोटींची तरतूद करण्यात आली, त्यापैकी रु २४५.२० कोटी पुरस्कारांसाठी, तर उर्वरित निधी प्रचार, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनासाठी वापरण्यात येणार आहे.

**अभियानाचे उद्दिष्ट**

या अभियानाचा मुख्य उद्देश गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करणे आहे. योजना केवळ प्रशासकीय यंत्रणेपुरती मर्यादित नसून, ग्रामस्थांच्या थेट सहभागावर आधारलेली आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास विभाग शाश्वत विकास साधण्यासाठी ठिबक सिंचन, शेततळी, बंधारे, जलसंवर्धन, जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी प्रयत्न, आवास योजनांतर्गत घरे, महिलांना बचतगटांच्या माध्यमातून सक्षम करणे, तसेच दुग्धोत्पादन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय आणि कुक्कुटपालन यांना चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. या प्रयत्नांना अभियानातून प्रोत्साहन मिळणार आहे.

**अभियानाचे ७ प्रमुख घटक**

१. सुशासनयुक्त पंचायत - पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन, २. सक्षम पंचायत - आर्थिक स्वावलंबन, कंपनी सामाजिक उत्तरदायित्व निधी (CSR) व लोकवर्गणी, ३. जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव - पर्यावरण संरक्षण व पाणी व्यवस्थापन, ४. योजनांचे अभिसरण - मनरेगा व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी, ५. संस्था सक्षमीकरण - शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे यांची बळकटी, ६. उपजीविका विकास व सामाजिक न्याय - रोजगार निर्मिती व महिला सक्षमीकरण, ७. लोकसहभाग व श्रमदान - ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग व श्रमदान,

खरं तर सातवा घटक वैशिष्ट्यपूर्ण असून गावकऱ्यांचा थेट सहभाग व श्रमदान याचा अर्थ लोकसहभाग व श्रमदान यातून हे अभियान लोकचळवळ बनणे अपेक्षित आहे. अभियानाला प्रोत्साहन देण्याचे काम पुरस्काराच्या रूपाने होईल. पुरस्कारांसाठी एकूण २४५.२० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकूण १९०२ यशस्वी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. या गावांच्या विकास कामांसाठी या ग्रामपंचायतींना मोठा निधी उपलब्ध होईल.

पुरस्कार रचना : राज्यात प्रथम विजेत्या ग्रामपंचायतीस ५ कोटी रुपयांचा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जाईल. तर द्वितीय ३ कोटी रुपये, तृतीय २ कोटी रुपये पुरस्कार असेल .

विभागस्तरीय पुरस्कार -प्रत्येक विभागात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रुपये १कोटी, द्वितीय रुपये ८० लाख, तृतीय रुपये ६० लाख

जिल्हास्तरीय पुरस्कार -

प्रत्येक जिल्ह्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रू ५० लाख, द्वितीय रू ३० लाख, तृतीय रुपये २० लाख

तालुकास्तरीय पुरस्कार :-प्रत्येक तालुक्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार प्रथम रुपये १५ लाख, द्वितीय रुपये १२ लाख, तृतीय रुपये ८ लाख

विशेष पुरस्कार : प्रत्येकी तालुक्यातील २ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ५ लाख रुपये पुरस्कार आहे.

विभाग आणि राज्यस्तरावर पंचायत समित्यांसाठी आणि जिल्हा परिषदासाठी ही आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहे.

पंचायत समित्यांना ३ राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतील. प्रथम २ कोटी, द्वितीय १.५ कोटी, तृतीय १.२५ कोटी असे पुरस्कार आहे.

विभागस्तरीय पुरस्कारांमध्ये प्रथम १ कोटी, द्वितीय ७५ लाख, तृतीय ६० लाख रुपये असे आहे

जिल्हा परिषदांना अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी राज्यात ३ जिल्हा परिषदांना पुरस्कार आहेत यात प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी, तृतीय २ कोटी असे पुरस्कार दिले जातील.

या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा असून, एकूण १०० गुणांच्या निकषांवर मूल्यांकन केले जाईल. पारदर्शक प्रशासन, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार, पर्यावरण, कर वसुली आणि लोकसहभाग यांचा विचार केला जाईल. प्रत्येक ग्राम पंचायतीने दररोजचा अहवाल विशेष मोबाईल प्लिकेशन आणि वेबसाईटवर सादर करावा लागेल.

अभियानापूर्वी राज्यस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रशिक्षण, तसेच ग्राम सभांच्या माध्यमातून तयारी केली जाईल. व्यापक जनजागृतीसाठी कार्यशाळा, पोस्टर, बॅनर, सोशल मिडिया, यशोगाथा चित्रफीत आणि इतर साधनांचा उपयोग केला जाणार आहे.

राज्य आणि देशाच्या शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण ही प्रगतीची पहिली पायरी आहे. सक्षम युवा पिढी घडवण्यासाठी गावांमध्ये डिजिटल वर्ग, ई-लर्निंग, पुस्तकालये, तसेच कौशल्याधारित प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणे. यातून युवक युवतींना संगणक, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रिक, शिवणकाम, कारागिरी अशा विविध व्यवसाय शिक्षणातून कौशल्य दिल्यास रोजगार निर्मिती व उद्योजकता वाढेल. अशा गावाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या सर्व घटकांना चालना देण्यावर या निमित्ताने लक्ष दिले जात आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान ही केवळ स्पर्धा नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाची दिशा आहे. प्रत्येक ग्राम स्थाने यात सहभाग घेतल्यास गावांचा चेहरामोहरा बदलून शाश्वत विकास साध्य होईल. हे अभियान खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे दूरदृष्टीपूर्ण पाऊल ठरेल.

**किरण वाघ, विभागीय संपर्क अधिकारी**

# अशी करा कर्ज-बेबाकी !

शेतकऱ्यांची कर्ज-बेबाकी (कर्जमाफी चुकीचा शब्द आहे.) व्हायलाच हवी, यात दुमत असण्याचे कारण नाही. ही कर्ज-बेबाकी फक्त शेतकऱ्यांचीच व्हायला हवी. इतरांची नको. इतर कोण आहेत, हे जाणून घ्यायला हवे. सात-बारा असणारा प्रत्येक जण शेतकरी आहे असे आता मानता येत नाही. भ्रष्ट सरकारी अधिकारी, लुबाडणूक करून पैसा कमावणारे, ज्या व्यवसायात अमाप कमाई होते असे बडे व्यवसायिक, राजकारणी (विशेषतः सत्ताधारी) यांच्याकडे सात बारा आहेत. त्यांची शेते हिरवी दिसतात. पण त्यांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन शेती नाही. मग त्यांनी शेतीत एवढी गुंतवणूक का केली? असा प्रश्न मनात आला असेल तर तोही जाणून घ्या. आपल्या देशात शेतीमालावर आयकर लागू होत नाही. असा कायदा आहे. या कायद्याचा लाभ शेतकऱ्यांना होत नाही. वर ज्या लोकांची यादी दिली आहे, फक्त त्यांनाच होतो. ते लोक आपल्याकडील करपात्र पैसा शेतीच्या उत्पन्नातून आला असे दाखवतात आणि तो पैसा करमुक्त होतो. चोरांच्या सोयीचा हा कायदा सरकार आणि गुन्हेगार यांच्या संगनमताने चालतो. आम्ही हा कायदा रद्द करावा. अशी मागणी केली परंतु सरकार त्याकडे दुर्लक्ष करतो.

ह्या चोरांना बँकेचे मोठे कर्ज मिळते. खऱ्या शेतकऱयांचे कर्ज २५ हजार रुपये थकलेले असेल तर या लोकांचे अडीच कोटी रुपये थकलेले असतात. कर्जमाफी झाली तर ह्या अडीच कोटीवाल्यांची चांदी होणार असते. ज्यांना कर्ज माफीचा जास्त फायदा होणार असतो ते लोक कर्जमाफीच्या आंदोलनाच्या पाठीशी ताकद लावत असतात. आम्ही मात्र त्या दोन एकरवाल्याचे भले होईल म्हणून अशा आंदोलनाच्या पाठीशी फरफटत जात राहतो.

तुम्हाला हे माहीत आहे का, की सरकारी नोकरी करणाऱ्या व्यक्तीला दुसरा धंदा करण्यास मनाई आहे. असा कायदा आहे. तरीही अनेक नोकरी करणाऱ्या लोकांच्या नावाने शेत जमिनी आहेत. त्यांच्या नावाने शेतमाल बाजारात विकला जातो. अनेक कर्मचारी आपल्याला आयकर मधून सूट मिळावी म्हणून मार्केटच्या पावत्या दाखल करतात. याचा अर्थ ते सरकारी नोकरीचा कायदा भंग करतात. कोणी म्हणेल की त्यांना वंश परंपरेने शेत मिळालेले असते. बरोबर आहे. तुम्हाला वंश परंपरेने जमीन मिळालेली असते. त्यावर शेती तर तुम्हीच करताना. या बाबत कोणी काही बोलायला तयार नाही. माझा मुद्दा हा आहे की ज्यांना वेतन आयोगा प्रमाणे पगार मिळतो, त्यांना कर्ज बेबाकी का करावी?

**त्यांना रोख रक्कमही द्या**

शेती हेच उत्पन्नाचे मुख्य साधन असणारे म्हणजेच फक्त शेतीवरच आवलांबून असणारी किती कुटुंबे महाराष्ट्रात असतील? या बाबत अधिकृत अभ्यास झालेला नाही. ना विद्यापीठाणी केला, ना सरकारने केला. किसानपुत्र आंदोलनाने शिबिरात चर्चा केली. मी महाराष्ट्रात ठिकठिकाणी फिरून परिस्थिती जाणून घेतली त्या नुसार आज महाराष्ट्रात १० ते २० टक्के कुटुंबे शेतीवर आवलांबून आहेत. शहराच्या जवळच्या गावात १० टक्केपेक्षा कमी व शहरापासून दूर असलेल्या गावात अधिकतम २० टक्के कुटुंबे आहेत. यांच्या वरचे कर्ज बेबाकी करावे. शिवाय इतरांना जी रक्कम तुम्ही वाटणार होता, ती रक्कम महिन्याला १८ हजार रुपये (चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याचा पगार) या प्रमाणे देण्याची व्यवस्था करावी. ज्यांच्या घरात शेती बाह्य उत्पन्न सुरू झाले, त्यांच्या घरात आत्महत्या होत नाही. केवळ शेतीवर अवलंबून असणाऱ्यांच्या घरातच शेतकरी आत्महत्या होते. या अठरा हजारांमुळे त्या घरातील आत्महत्या चालू शकते. ही रक्कम तीनचार वर्षे दिली तरी परिस्थिती बदलेल.

बिगर शेतकऱ्यांना खिरापत वाटण्या पेक्षा सत्पात्री मदत करणे केंव्हाही चांगले.

**पुन्हा पुन्हा कर्जबाजारी**

शेतकरी म्हणजे ज्याच्या उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे.यालाच असेही म्हणता येईल की, जे कुटुंब शेतीवर अवलंबून आहे ते शेतकरी. या व्याख्येनुसार कृषी क्षेत्रात राबणारे मंजूरही शेतकरी समजले जातात.

शेतकरीविरोधी कमाल शेतजमीन धारणा कायदा, आवश्यक वस्तू कायदा, आदी कायद्यानी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांना अक्षरशः भरडून काढले आहे. हे कायदे सरकारने केले व आज सत्ताधारी पक्ष बदलला असला तरी तेच कायदे राबविले जात आहेत. किंबहुना जास्त क्रूरतेने आणि कठोरपणे राबविले जात आहेत. या कायद्यानी शेतकऱ्यांना जायबंदी केले आहे. विकलांग केले आहे. त्यामुळे शेतकरी थकबाकीदार होतात. त्यामुळे त्यांच्यावरील कर्ज अनैतिक आहे. ते बेबाक झाले पाहिजे यात शंका नाही.



एक प्रश्न विचारात घेतला पाहिजे की सरकारने अनेकदा कर्ज माफी केली, तरी पुन्हा शेतकरी का थकबाकीदार होतो?

केंद्र सरकारने शेतकरी कर्जमाफी दोन वेळा केली आहे:

पहिली वेळ: १९९०-९१ मध्ये व्ही.पी. सिंग सरकारने १०,००० (दहा हजार) रुपयांपर्यंतचे कर्ज माफ केले होते. प्रारंभिक अंदाजित निधी एक हजार कोटी रुपये एवढा होता, परंतु खर्च वाढून सात हजार आठ शे पंचवीस कोटी रुपये एवढा वाढला .

दुसरी वेळ: २००८ मध्ये मनमोहन सिंग सरकारने त्यांच्या पहिल्या टर्म मध्ये कृषी कर्ज माफी योजना राबवली. यात शेतकरी कर्जावर प्रारंभिक अंदाजानुसार एकूण रु ५२,००० (बावन्न हजार) कोटी राखीव ठेवण्यात आले होते. काही स्रोतांनुसार, खर्च आणि लाभार्थी संख्या वाढल्यावर एकूण रु ७१,६८० (एकाहत्तर हजार सहा शे ऐंशी) कोटी पर्यंत खर्च पोचला.

केंद्र सरकारने स्वतंत्र भारतात शेतकरी कर्जमाफी फक्त दोन वेळा केली, आणि एकूण खर्च अंदाजे रु ६०,०००+ रु ७०,००० कोटी असे १३० हजार कोटी रुपये खर्च केले.

महाराष्ट्र सरकारने २०१७ मध्ये (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना' अंतर्गत शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली होती. त्यासाठी रु ३४,००० (चौतीस हजार) कोटी खर्चांची तरतूद केली होती .

२०१५ पासून १९ (महाविकास आघाडी सरकार) या कालावधीत महाराष्ट्र सरकारने एक किंवा अधिक संस्थांकडून घेतलेल्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर शिथिलता देण्याची योजना आखली होती. त्यावर काही हजार कोटी खर्च केले होते.

२०२४-२५ मध्ये, महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना अंतर्गत लहान आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी रु दोन लाख पर्यंतचे कर्ज माफ करण्याची घोषणा करण्यात आली होती.

हे सगळे केले तरी शेतकरी पुन्हा कर्जबाजारी का होतात? याचा विचार केला पाहिजे. वर नमूद केलेले कायदे जो पर्यंत कायम राहतील तो पर्यंत शेतकऱ्याची या फऱ्यातून सुटका होणे शक्य नाही.

तुम्ही जर शेतकऱ्यांची समस्या सोडवायला निघाला असाल तर तुम्हाला शेतकरीविरोधी कायदे रद्द करून घेण्याची लढाई लढावीच लागेल.

**अमर हबीब, आंबाजोगाई,**
**किसानपुत्र आंदोलन**
**मो. ८४११९०९९०९**

## पान १ वरुन

### सुप्रिया कॉलेज ...

झालेली असून एवढ्या कमी वेळेत Very Good मानांकन प्राप्त झाल्यामुळे महाविद्यालयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशाकरिता महाविद्यालयाच्या संस्थाध्यक्षा डॉ. सुरेखाताई संजय लहाने,महाविद्यालयाचे सचिव श्री.संजय लहाने सर, सहसचिव सुयश लहाने या सर्वांनी महाविद्यालयाचे प्राचार्य एम.एन.पठाण, विभाग प्रमुख प्रा.शिवम सोनसाळे, प्रा.रूपाली तायडे, प्रा.प्रतीक्षा जोशी, प्रा.पौर्णिमा बनकर, प्रा.कल्याणी परिहार, प्रा. आकाश पवार, प्रा.मोहन वाघ, श्री.राजेंद्र साखरे, श्री अजय महामुने, सौ.वर्षा देशमुख, सौ. पुजा बोडखे, श्री. मुकेश पांडव, श्री.लहू जोशी, श्री.कैलास बकाल या सर्वांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### राहत सोशल ...

शेख सलीम शेख मुहम्मद, शेख सलीम शेख शकूर, सलीम यासीन खान पठाण आणि इतरांशी संपर्क साधावा. लग्नासाठी, मुलगा २१ वर्षांचा आणि मुलगी १८ वर्षांची असल्याचे सिद्ध करणारे कागदपत्रे असणे आवश्यक आहे. मुस्लिम सामूहिक विवाहांमध्ये, राहत सोशल ग्रुप जालना वधू-वरांना त्यांच्या क्षमतेनुसार कपडे, पलंग ,भांडी बरतन आणि इतर जीवनावश्यक वस्तू उपहार स्वरूप देण्यात येईल. त्यामुळे, मुलगा आणि मुलीच्या पालकांनी २० नोव्हेंबरपूर्वी आवश्यक कागदपत्रांसह राहत सोशल ग्रुप जालनाच्या जबाबदार व्यक्तींशी संपर्क साधावा.

## जीएसटी स्लॅबमध्ये बदल

**नवी दिल्ली -** सणासुदीच्या काळात, दिवाळीच्या तोंडावर केंद्र सरकारने सर्वसामान्यांना आणि व्यापाऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. आधी असलेल्या जीएसटीच्या चार स्लॅबपैकी १२ टक्के आणि २८ टक्क्यांचा स्लॅब रद्द करण्यात आला. त्यामुळे देशात आता फक्त ५ टक्के आणि १८ टक्के असेल दोनच जीएसटी स्लॅब असतील. सरकारच्या या निर्णयामुळे इलेक्ट्रॉनिक वस्तू, खाद्यपदार्थ, साबण, कपडे, पादत्राणे यासह रोजच्या वापराच्या गोष्टी स्वस्त होणार आहेत. सरकारचा हा निर्णय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी, म्हणजे २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहे. नवी दिल्लीत जीएसटी कौन्सिलची महत्त्वाची बैठक पार पडली. त्यामध्ये हा मोठा निर्णय घेण्यात आला.

# खेळामुळे खेळाडूंची शारीरिक क्षमता वाढते - पोउपनि राजधर पठाडे

**जाफराबाद । प्रतिनिधी -** क्रीडा व युवक सेवा संचालक महाराष्ट्र राज्य पुणे १ व जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा परिषद कार्यालय जालना यांच्या आदेशान्वये जाफराबाद तालुकास्तरीय शालेय १७ वर्षातील मुले मुली खो खो या क्रीडा स्पर्धेचे समर्थ महाविद्यालय येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष समर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री संजय गौतम हे होते त्यांनी अध्यक्ष भाषणामध्ये खेळाडूंनी प्रामाणिकपणे खेळ खेळावा पंचाचा निर्णयाच्या आदर करावे तसेच उद्घाटन हे भाषण मध्ये श्री जाफराबाद पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक राजधर पठाडे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करत असताना खेळामुळे शारीरिक क्षमतेत वाढ होते तसेच जिद्द प्रामाणिकपणा चिकाटी राष्ट्रीय एकात्मता असणे गरजेचे आहे. खेळाडूंनी कोणताही खेळ प्रामाणिकपणाने खेळावे खेळाडू हा व्यसनमुक्त असला पाहिजे . व्यसनमुक्त खेळाडू हा देशाचा आधारस्तंभ असतो . खेळाडूंनी दररोज व्यायाम करावे चांगल्या क्रीडा मार्गदर्शकाचे प्रशिक्षण घ्यावे व जे खेळाडू राज्यस्तरावर प्राविण्य असेल अशा खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये ५ टक्के आरक्षण असते असे खेळाडूंना मार्गदर्शन केले



या क्रीडा स्पर्धेसाठी प्रमुख उपस्थितीमध्ये पत्रकार तालुकाध्यक्ष श्री मुकेश भारद्वाज , ज्येष्ठ पत्रकार मोहन भाऊ मुळे, प्रकाश मिरगे, चेतन बायेस, भरत लहाने, तालुका संयोजक प्राध्यापक वाहेद पटेल, पोलीस कॉन्स्टेबल, डोईफोडे, आत्माराम मरकड प्राध्यापक प्रकाश निकम प्रा. शिवाजी वैद्य इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती

जाफराबाद तालुक्यातील शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये.२० संघांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये जिल्हा परिषद माहोरा मी हायस्कूल जाफराबाद न्यू हायस्कूल वरुड समर्थ महाविद्यालय जाफराबाद शिवाजी विद्यालय बोरगाव, स्वामी विवेकानंद बुटखेडा, भवानी विद्यालय देळेगव्हाण, जिल्हा परिषद शाळा खासगाव, तसेच राजे संभाजी विद्यालय जवखेडा ठेंग , छत्रपती शिवाजी विद्यालय आश्रम शाळा माहोरा जिजामातांनी विद्यालय निमखेडा, आयेशा उर्दू हायस्कूल टेंभुर्णी, इत्यादी मुला मुलीच्या , संघाने सहभाग नोंदवला .

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पंच म्हणून आदित्य रेवगडे, विलास पुंगळे, विजय मोहिते, सागर तारू, अमोल अंभोरे, सोमीनाथ दगडघाटे, ओमराज उखर्डे, सोमीनाथ मघाडे, इत्यादी पंचांनी उत्कृष्ट पंचगिरी केली. अंतिम सामना हायस्कूल जाफराबाद विरुद्ध जिल्हा परिषद शाळा खाजगाव यांच्यामध्ये अतिथटीचा सामना झाला त्या सामन्यामध्ये न्यू हायस्कूल जाफराबाद या संघाने अजिंक्यपद पटकाविले व मुलीमध्ये जिजामाता विद्यालय निमखेडा यांची जिल्हा स्तरावरती निवड झाली.

# टेंभुर्णी येथे गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून पथ संचलन



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** टेंभुर्णी पोलीस स्टेशनच्या वतीने सुरू असलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आज शहरात पथ संचलन (रूट मार्च) काढण्यात आले. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार टाळण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल पूर्णपणे सज्ज असल्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती आणि सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब खार्डे यांच्या नेतृत्वाखाली हे पथ संचलन काढण्यात आले. टेंभुर्णी पोलीस स्टेशनपासून सुरू झालेले हे संचलन शहरातील मुख्य रस्ते, मारवाडी गल्ली आणि भाजी मंडीमार्गे माळी गल्लीपर्यंत काढण्यात आले.

गणेशोत्सवाच्या काळात शांतता आणि सुरक्षितता राखणे हे पोलिसांचे मुख्य उद्दिष्ट आहे. या पथ संचलनामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, कोणताही अनुचित प्रकार घडल्यास पोलीस दल तत्परतेने कारवाई करेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. सर्व पोलीस कर्मचारी आणि अधिकारी सतर्क असून, नागरिकांनी शांततेचे आणि सहकार्याचे वातावरण कायम ठेवावे, असे आवाहनही या वेळी करण्यात आले.

# मराठा आंदोलकांचे धाकलगावात जल्लोषात स्वागत



**धाकलगाव । प्रतिनिधी -** मराठा आरक्षणासाठी सुरू असलेले आंदोलन आणि मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणानंतर, शासनाने आरक्षणाबाबत अध्यादेश काढल्याने आंदोलकांनी मोठा विजय साजरा केला. मुंबईहून परतलेल्या धाकलगावातील आंदोलकांचे गावात जोरदार स्वागत करण्यात आले.

गावात पोहोचलेल्या आंदोलकांचे महिलांनी औक्षण करून स्वागत केले. यानंतर, ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत संपूर्ण गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. एक मराठा, लाख मराठा आणि आरक्षण आमच्या हक्काचे यांसारख्या घोषणांनी संपूर्ण गाव दुमदुमून गेले होते. नागरिकांनी गुलालाची उधळण करत आपला आनंद व्यक्त केला.

या वेळी गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनी आंदोलकांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या लढ्याला सलाम केला. या विजयामुळे गावातील वातावरण उत्साही आणि आनंदी बनले होते.

# अल फलाह इंग्लिश स्कूलमध्ये पर्यावरण संवर्धनाचा संकल्प

**परतूर । प्रतिनिधी -** पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी झाडे लावणे किती महत्त्वाचे आहे, हे लक्षात घेऊन परतूर येथील अल फलाह इंग्लिश स्कूलने एक अभिनव उपक्रम राबवला. या उपक्रमात शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला.

**प्रत्येक विद्यार्थ्याने लावले एक झाड**

शाळेचे मुख्याध्यापक फरहान खतीब यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी यात उत्साहाने भाग घेतला. शाळेच्या आवारात तसेच विद्यार्थ्यांच्या घराच्या परिसरातही विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. यामध्ये फळझाडे, शोभेची झाडे आणि सावली देणाऱ्या झाडांचा समावेश होता.

**पुस्तकी ज्ञानासोबत निसर्गाची जोड**

यावेळी बोलताना मुख्याध्यापक खतीब म्हणाले, केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. विद्यार्थ्यांची निसर्गाशी नाळ जोडली जाणे खूप महत्त्वाचे आहे. झाडे ही आपली खरी संपत्ती आहेत. आज विद्यार्थ्यांनी लावलेले हे रोपटे भविष्यात 'हरित परतूर' निर्मितीमध्ये मोठे योगदान देईल. या उपक्रमात शाळेतील जवळपास ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरुकता निर्माण झाली असून, त्यांच्यात जबाबदारीची भावना वाढेल, असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला.



# संघर्ष योद्धा मनोज जरांगे मुंबईतील आंदोलनास प्रेरणास्तव माऊलीनगरात बारा तास भजन संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** मुंबई येथे संघर्षयोद्धा मनोज जरांगे व लाखोच्या संख्येने मराठा बांधव आरक्षण मिळविण्यासाठी आंदोलन करत आहेत. त्यांच्या प्रेरणास्तव व मराठा आंदोलनाला यश प्राप्त होण्यासाठी अंबड रोड वरील माऊलीनगर येथील



श्रीहनुमान मंदिर येथे दिनांक २ रोजी बारा तास शहरातील विविध भजनी मंडळाचे भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यावेळी कीर्तनकार हभप चंद्रशेखर म. दर्प अशोक म.पात्रुडकर, विठ्ठल म.काळे,संदीप म.गुंजकर, राजू म.गव्हाणे, भागवत म. नागवे, शंकर म.अनपट,जय म. कराड, भीमराव खरसाडे,अनिल म.टाक, काकडे महाराज रवींद्र म .मदने,गजानन म. मूळक, अजय म वाघमोडे, घनश्याम म भोर्डे, काटे महाराज, पाटेकर महाराज,मुरलीधर म.भोपळे विष्णू म. जिरेकर निवृत्त पोलिस निरीक्षक निवृत्ती म .कोल्हे, बाळासाहेब म .घायल, यांचे भजन झाले या कार्यक्रमाचे आयोजन गजानन काळे, ज्ञानेश्वर मदन, नाथराव गोल्डे, रतन दळवी, उद्धव बागल,पांडुंग मराठे, नाथराव कानकाटे, गुलाब दळवी, विनायकराव नवल, रावसाहेब पांढरे, सुभाष भावर, भगवान साबळे सौ,दळवीताई,सौ. झोडगेताई, सौ.चौधरीताई यांच्या वृत्तीने करण्यात आले होते.

### मलकापूर पांग्रात आगळे वेगळे गौरीपूजन

# महिलांनी जिजाऊ माँ साहेब- सावित्रीबाई चा आदर्श घ्यावा - सौ. रंगोली सोनुने



**सिंदखेड राजा । प्रतिनिधी -** बुलढाणा जिल्ह्यातील मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथील सोनुने परिवारातील सून सौ.रंगोली अभिलाष सोनुने यांनी या वर्षी गौरी पूजनाचा आगळा वेगळा सण साजरा करण्याचा विचार सासू सासरें यांचे सह सोनुने परिवारात मांडला.परिवाराने तात्काळ मान्यता देत आजचा समाज प्रबोधन करणारा आधुनिक गौराई चा सण साजरा करताना कोण काय म्हणेल याकडे लक्ष न देता आपण समाजाला गौरी पूजनाच्या ऐवजी सावित्रीबाई फुले , जिजाऊ माँ साहेब थोर कर्तृत्ववान अशा या महिलेचा आदर्श समोर ठेवून आपण सावित्रीबाई फुले व जिजाऊ माँ साहेब यांचे विचारांचं पूजन करायला हवे ,असे मत सौं रंगोली सोनुने यांनी व्यक्त केले.

आपल्या राहत्या घरी मलकापूर पांग्रा येथे सावित्रीबाई फुले व जिजाऊ माँ साहेब , छत्रपती शिवराय यांच्या प्रतिमा ,भारतीय संविधान , फुले -शाहू -आंबेडकर ,संत गाडगेबाबा यांची विचारधारा सांगणारी ग्रंथ.कॉम्रेड.गोविंदराव पानसरे यांनी शिवाजी कोण होता ? आदी समाज प्रबोधन करणारी ग्रंथप्रदर्शन मांडण्यात आले आहे.

हे थोरांचे विचार प्रत्येकाच्या मनामनात रुजले पाहिजे तसेच ते घराघरात पोहचावेत जेणे करुन आपले मलकापूर पांग्रा हे गाव अंधश्रद्धा मुक्त , नशा मुक्त , स्वच्छ , सुंदर ,समृध्द व्हावे अशी संकल्पना सासरे शिवश्री इंजि.विष्णु आश्रुजी सोनुने वयाच्या १८ ते २० वर्षापासून मनात होती. समाजाला ते आपल्या बोली भाषेमधून संदेश देण्याचा प्रयत्न ही करत असत. परंतु सोनुने साहेब रिलायन्स कंपनीमध्ये एक जबाबदार पदावर नोकरीवर असताना त्यांना वेळ तेवढा मिळत नसल्याने हे सारे विषय त्यांच्या मनात घर करून बसलेले असताना त्यांच्या सुनबाई सौ.रंगोली अभिलाष सोनुने यांनी आपल्या सासऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या इच्छेनुसार मलकापूर पांग्रा व परिसरातील जनतेला संदेश देणारा हा नाविण्यपूर्ण सण साजरा करण्याची भावना मनाशी बाळगून ताईने हे पाऊल उचललेले दिसून येत आहे. या पासून एक- दोन महिला जरी सुधारल्या त्यांनी फुले - शाहु - आंबेडकर ,संत गाडगेबाबा या थोरांची विचारधारा अंगिकारली तर मोठे परिवर्तन दिसून येईल अशी इच्छा सौं रंगोली सोनुने व सोनुने परिवारांची दिसून आली.

सासरे विष्णू सोनुने यांनी आपली इच्छा व्यक्त केली की मला ६0 वर्ष पूर्ण झालीत. उरलेल माझं आयुष्य समाजाच्या व गावच्या भल्यासाठी असेल . समाजाला - गावाला जास्तीत जास्त वेळ देण्याचा मी प्रयत्न करीत राहील. गावाचा विकास कसा होईल यासाठी मी सदैव प्रयत्नशील असेल ,असा मनोदय शिवश्री इंजि.विष्णु सोनूने यांनी प्रसंगी व्यक्त केला.

# चाकू आणि लोखंडी झाऱ्याने केलेल्या हल्ल्यात टेंभुर्णीत तरुण जखमी; दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** चाकू आणि लोखंडी झाऱ्याने केलेल्या हल्ल्यात येथील तरुण इम्रान जाफर खॉ पठाण (वय-३४ वर्ष) हा युवक जखमी झाला असून याप्रकरणी दोघाजणाविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस स्टेशन मध्ये दिलेल्या फिर्यादीत इम्रान पठाण(वय ३४) व्यवसाय-भुसार माल विक्री रा. बिलाल नगर टेंभुर्णी ता.जाफराबाद यांनी म्हटले आहे की मागील सहा महिन्यापुर्वी माझा मित्र रफिक दादामीयॉ पठाण (वय ३६ वर्षे) व त्याचा साला फयाज सय्यद मुसा (वय ३८ वर्षे) दोघे रा. टेंभुर्णी हे मला भेटले व मला म्हणाले चल मी तुला औरंगाबाद फिरवुन आणतो व खर्च करतो असे म्हणून जालना येथे नेले तेथुन एक स्कॉर्पीओ गाडी केली व त्यात बसविले व मला आठ दिवस फिरविले तेथे फिरवता फिरवता मला दोघांनी सांगीतले की,आपल्याला सतिश जैस्वाल याला मारुन टाकण्याची सुपारी भेटली आहे.ते काम करायचे आहे असे म्हणल्यावर मी अगोदर संजय जैस्वालच्या दारुच्या दुकानावर काम करत असल्याने व दोघे भाऊ असल्याने मी ओळखत असल्याने मी असे कामे करत नाही असे दोघांना सांगुन मी एसटी बसने टेंभुर्णी येथे निघुन आलो.त्यानंतर दोघांनी मला फोनवर व प्रत्यक्ष भेटल्यानंतर तु आमचे काम केले नाही तेरेको जिंदा मार देंगे, तेरेको जन्नत दिखा देंगे अश्या धमक्या टाकत होते ते कोठेही भेटले की मला खुन्नसने बघत होते. वेगवेगळ्या धमक्या देत होते. गुरुवारी दिनांक २८/0८/२०२५ रोजी सकाळी १0.00 वाजेच्या सुमारास इम्रान पठाण व सोबत अयुब कुरेशी, दादु कुरेशी असे टेंभुर्णी येथील खालच्या बसस्टँड वरून कामासाठी निघाल्यावर असता युसूप बागवान यांच्या कँटीन च्या समोर दोघे आलो असता थोड्या अंतरावर रफीक दादामियाँ पठाण हा उभा असलेला दिसला व फैयाज सय्यद मुसा आणि रफिक पठाण यांनी चाकू आणि लोखंडी झाऱ्याने इम्रान पठाण च्या डोक्यावर हल्ला करून जखमी केले. याशिवाय यावेळी दोघानी हातात दगड घेवून इम्रान पठाण यांच्या हातावर, पायाच्या मांडीवर,नळगीवर मारून मुक्का मार दिला. टेंभुर्णी येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर फिर्यादी जखमींना जालना सामान्य रुगणालय येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे. फिर्यादीच्या फिर्यादीनुसार रफिक दादा मी पठाण, फय्याज सय्यद मुसा यांच्याविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाण्यात १०९,११८(१),११८(२)३५१(२)३५१(३).३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब खार्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी करत आहेत. रात्री उशिरा जालना येथील फॉरेन्सिक लॅबच्या टीमने येऊन घटनास्थळी तपासणी केली.

# जालना येथे १४ वर्षांखालील मुलांसाठी क्रिकेट निवड चाचणी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धांसाठी जालना जिल्हा क्रिकेट असोसिएशनने १४ वर्षांखालील मुलांच्या जिल्हा संघाची निवड करण्यासाठी एक विशेष चाचणी आयोजित केली आहे. या निवड चाचणीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

निवड चाचणीचे ठिकाण आणि वेळ ही निवड चाचणी रविवार, दिनांक ०७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. साई काणे




क्रिकेट अॅक्डमीच्या ीी ढीष मैदानावर, एमआरडीए स्कूल जवळ, रोहनवाडी रोड, जालना येथे ही चाचणी घेण्यात येईल.

या निवड चाचणीमध्ये १ सप्टेंबर २०११ नंतर जन्म लेल्या मुलांना सहभागी होता येणार आहे. इच्छुक मुलांनी निवड चाचणीच्या वेळी त्यांचे जन्म प्रमाणपत्र, आधार कार्ड, टी.सी., आणि दहावीची सनद यांसारख्या कागदपत्रांच्या सत्यप्रती सोबत आणणे आवश्यक आहे.

सर्व खेळाडूंना क्रिकेटच्या योग्य पोशाखात आणि स्वतः च्या क्रिकेट साहित्यासह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या निवड चाचणीसाठी अधिक माहितीसाठी, खेळाडू ९८२३३७३३६१ किंवा ९९२२९३३१३८ या क्रम ांकांवर संपर्क साधू शकतात.

जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालनाचे अध्यक्ष ॲडव्होकेट नरेंद्र देशपांडे, राजू काणे आणि अभिजीत चव्हाण यांच्या वतीने हे आवाहन करण्यात आले आहे. या निवड चाचणीमुळे जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंना त्यांच्या प्रतिभेचे प्रदर्शन करण्याची आणि राज्यस्तरीय स्पर्धेत खेळण्याची एक उत्तम संधी मिळेल.

# अंबड-शहागड रोडवर एस.टी. बस आणि टेम्पोची धडक, प्रवासी सुखरूप

**धाकलगाव । प्रतिनिधी -** अंबड आगाराची परभणीहून अंबडकडे येणाऱ्या एस.टी. बसचा आज, बुधवारी (दि. ३ सप्टेंबर), अंबड-शहागड रोडवरील सुखापुरी फाट्याजवळ एका आयशर टेम्पोशी भीषण अपघात झाला. या अपघातात बसमधील ५२ ते ५३ प्रवासी सुखरूप असून, केवळ बसचालक किरकोळ जखमी झाले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, बस (क्रमांक MH-21B-BH 5855) परभणीहून अंबडकडे येत होती. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांसह ५२ ते ५३ प्रवासी प्रवास करत होते. त्याचवेळी, बीडकडून येणाऱ्या आयशर टेम्पोचे (क्रमांक MH-21B-BH 5855) नियंत्रण सुटले आणि त्याने बसला जोरदार धडक दिली.

या अपघातात बसचे मोठे नुकसान झाले आहे. बस चालक अमोल ठुबे यांच्या पायाला दुखापत झाली आहे. सुदैवाने, इतर सर्व प्रवासी सुरक्षित आहेत. अपघातानंतर टेम्पोचालक टेम्पोसह घटनास्थळावरून पळून गेला. या अपघातामुळे काही काळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

# सोनगिरीत पिंपळे दांपत्यांनी स्वखर्चातून बनविला हातपंपापर्यंतचा गावअंतर्गत रस्ता

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यातील सोनगिरी येथील महिलांना गावातील हातपंपाहून पाणी आणण्यासाठी रस्त्याअभावी मोठी गैरसोय होत होती आपआपल्या घरापासून जा ये करण्यासाठी त्यांना चिखल पाणी खड्ड्या मधुन वाट काढत जा ये करावी लागत असे त्यांना जायला रस्ता नव्हता याबाबत गावातील काही तरुणांनी रुग्णदूत विशाल पिंपळे व समाजसेविका रोहिणी पिंपळे दाम्पत्याच्या ही बाब निदर्शनास आणून दिली यावेळी त्यांनी क्षणाचाही विलंब न करता गावातील हातपंपा पर्यंत २० मुरुमाच्या ५0 हजार रुपयांच्या ट्राल्या आणुन त्या रस्त्यावरील खड्डे बुजवून हा रस्ता सुसज्ज केला असून या मुरुमाच्या गावअंतर्गत केलेल्या रस्त्यामुळे हातपंपावरून पाणी भरणाऱ्या महिलांसह या रस्त्याने जा ये करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यावेळी रुग्णदूत विशाल पिंपळे व समाजसेविका रोहिणी पिंपळे यांनी प्रत्यक्ष त्या ठिकाणी उभे राहून हा मुरमाचा कच्चा रस्ता बनवून घेतला यावेळी रमेश पिंपळे , राजु सर्जेराव घोडके, दीपक रामधन रावळकर, अमोल रामदास घोडके, विठ्ठल शेळके, गणेश शेळके, भागवत पिंपळे , करण गायकवाड , प्रफुल्ल राऊत, ऋषिकेश गवळी, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.










हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.